# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## परकीय भाषा विभाग

खालील अर्धवेळ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे.

**भाषा व स्तर :**

१. **जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम : -** ***फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश जपानी*** (नव्याने या भाषा शिकणाऱ्यांसाठी)

२. **जलद पदविका अभ्यासक्रम : -** ***जर्मन*** **(ज्यांनी यापूर्वी जर्मन शिकले आहे त्यांच्यासाठी. शैक्षणिक पात्रतेचा तपशील त्या भाषेअंतर्गत पाहावा)**

**कालावधी :** १८० तास [आठवड्यातून ६ दिवस रोज २ तास]

**तारखांचा तपशील : जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम - १ फेब्रुवारी २०२१ ते २१ मे २०२१. परीक्षा मे २०२१ मध्येच.**

**जलद पदविका अभ्यासक्रम – १५ फेब्रुवारी २०२१ ते ५ जून २०२१. परीक्षा जून २०२१ मध्येच.**

❖ **सर्व प्रवेश महाराष्ट्र शासनाचे आरक्षणाचे नियम पाळून होतील.**

**शैक्षणिक अर्हता व तुकड्या : सर्व जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी**

SSC/ CBSC/ ICSE (दहावीची परीक्षा उत्तीर्ण)

| फ्रेंच भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा – शंभर) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तुकडी** | **वार** | **प्रहर** | **वेळ** | **प्रकार** | **संख्या** |
| F I C 3 | सोमवार ते शनिवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | दूरदृश्य प्रणाली | पन्नास |
| F I C 4 | सोमवार ते शनिवार | दुपार | ४ ते ६ | दूरदृश्य प्रणाली | पन्नास |

| स्पॅनिश भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा – पन्नास) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तुकडी** | **वार** | **प्रहर** | **वेळ** | **प्रकार** | **संख्या** |
| S I C 2 | सोमवार ते शनिवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | दूरदृश्य प्रणाली | पन्नास |

| जपानी भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा – पन्नास) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | प्रकार | संख्या |
| J I C 1 | सोमवार ते शनिवार | सकाळ | ७.३० ते ९.३० | दूरदृश्य प्रणाली | पन्नास |

## जर्मन भाषेच्या जलद पदविका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक अर्हता

**मूळ पात्रता : (७० टक्के जागा राखीव)**

परकीय भाषा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचा जर्मन भाषेचा प्रमाणपत्र / जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण

**समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) पुढीलपैकी काहीही एक –

१. HSC ला जर्मन भाषा या विषयात किमान ७० टक्के गुण;

२. FY BA/BCom ला जर्मन भाषा या विषयात किमान ७० टक्के गुण

३. जर्मन भाषेचे इतर मान्यताप्राप्त संस्थेचे १८० तासांचे प्रशिक्षण व त्यात किमान ८० टक्के गुण;

४. GI/MMB यांची A2 परीक्षा किमान ८० टक्के गुणांनी उत्तीर्ण

| Batch | Days | Time | Timing | Venue | Intake |
|---|---|---|---|---|---|
| जर्मन भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा १५०) | | | | | |
| G I C 4 | सोमवार ते शनिवार | सकाळ | ८.३० ते १०.३० | दूरदृश्य प्रणाली | पन्नास |
| G I C 5 | सोमवार ते शनिवार | सकाळ | ८.३० ते १०.३० | दूरदृश्य प्रणाली | पन्नास |
| G I C 6 | सोमवार ते शनिवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | दूरदृश्य प्रणाली | पन्नास |
| जर्मन भाषेचा जलद पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा १००) | | | | | |
| G I D 3 | सोमवार ते शनिवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | दूरदृश्य प्रणाली | पन्नास |
| G I D 4 | सोमवार ते शनिवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | दूरदृश्य प्रणाली | पन्नास |

## ❖ प्रवेशाचे वेळापत्रक

| जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (नवशिक्यांसाठी)<br>तास १ फेब्रुवारी २०२१पासून चालू होतील | पासून | पर्यंत |
|---|---|---|
| CCEP मध्ये अर्ज भरणे | १८ डिसेंबर २०२० | १६ जानेवारी २०२१ |
| पहिली गुणवत्ता यादी | २० जानेवारी २०२१ | |
| पहिल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी अभ्यासक्रम शुल्क भरणे | २३ जानेवारी २०२१ पर्यंत | |
| दुसरी गुणवत्ता यादी | २५ जानेवारी २०२१ सायं. ६ वा | |
| दुसऱ्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी अभ्यासक्रम शुल्क भरणे | २७ जानेवारी २०२१ पर्यंत | |
| तिसरी गुणवत्ता यादी (गरज पडल्यास) | २८ जानेवारी २०२१ दु १ वा | |
| तिसऱ्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी अभ्यासक्रम शुल्क भरणे | २९ जानेवारी २०२१ | |

**वि. सू. नेमके गुण भरणे आवश्यक आहे. ग्रेडचे गुणांत रुपांतर करून भरावे.**

| जर्मन भाषेचा जलद पदविका अभ्यासक्रम<br>तास १५ फेब्रुवारी २०२१पासून चालू होतील | From | To |
|---|---|---|
| CCEP मध्ये अर्ज भरणे | २४ डिसेंबर २०२० | २२ जानेवारी २०२१ |
| पहिली गुणवत्ता यादी | २८ जानेवारी २०२१ | |
| पहिल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी अभ्यासक्रम शुल्क भरणे | ३१ जानेवारी २०२१ पर्यंत | |
| दुसरी गुणवत्ता यादी | २ फेब्रुवारी २०२१ दु. १ नंतर | |
| दुसऱ्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी अभ्यासक्रम शुल्क भरणे | ५ फेब्रुवारी २०२१ | |
| तिसरी गुणवत्ता यादी (गरज पडल्यास) | ८ फेब्रुवारी २०२१ | |
| तिसऱ्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी अभ्यासक्रम शुल्क भरणे | १० फेब्रुवारी २०२१ | |

**वि. सू.** जर कोणी समकक्ष अर्हतेच्या जोरावर जर्मन भाषेच्या जलद पदविका अभ्यासक्रमासाठी अर्ज केला असेल तर अशा उमेदवारांनी आपला प्रवेश अर्ज क्रमांक dflgerman19.20@gmail.com या इमेल पत्त्यावर अर्ज भरल्यावर ताबडतोब कळवावा. समकक्ष अर्हताधारक उमेदवारांची प्रवेश परीक्षा दि. २५ जानेवारी रोजी होईल. त्याची माहिती अशा सर्व उमेदवारांना देण्यात येईल.

**शुल्क**

१. **प्रवेश अर्ज शुल्क रू. ५००/- (सर्वसाधारण) रू ३५०/- (अ.जाती, अ. जमाती च्या उमेदवारांसाठी) एकदा भरलेले प्रवेश शुल्क परत मिळणार नाही.**

## २. अभ्यासक्रमाचे शुल्क -

| अभ्यासक्रम | कालावधी | अभ्यासक्रमाचे एकंदर शुल्क | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र अधिवासी | महाराष्ट्राबाहेरील अधिवासी | SAARC देशाचे नागरिक | इतर परदेशी नागरिक |
| **जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | १८० तास | 4,754/- | 9443/- | 9,443/- | 14,132/- |
| **जलद पदविका अभ्यासक्रम** | १८० तास | 5430/- | 10,180/- | 10,180/- | 14,730/- |

**सर्व प्रवेश महाराष्ट्र शासनाचे आरक्षणाचे नियम पाळून होतील.**

**प्रवेशप्रक्रिया :**

१. http://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx या संकेतस्थळावर जा. जर तुम्ही दुसऱ्या कोणत्या पूर्णवेळ अभ्यासक्रमाला आधीच प्रवेश घेतलेला असेल तर तुमच्या आधीच्याच वापरकर्ता नावाने प्रवेश करा. यापूर्वी कधी या संकेतस्थळावर आला नसाल तर नव्याने Register या शब्दावर जाऊन आपला तपशील भरा.

२. सुरुवातीला तुम्हाला वैयक्तिक माहिती भरायची आहे. परकीय भाषा विभागाच्या अर्धवेळ अभ्यासक्रमांसाठी दहावीचे गुण आवश्यक आहेत. जर्मन भाषेच्या जलद पदविका अभ्यासक्रमासाठी आवश्यक त्या शैक्षणिक पात्रतेचे गुणही आवश्यक आहेत. विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमांसाठी हा भाग समान असल्याने, पुढे तुम्हाला प्रत्यक्षात ज्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा आहे त्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता इथेच अधोरेखित करावी लागते.

जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमासांसाठी SSC अंतर्गत Special / General यावर जावे व नंतर मूळ (Basic) किंवा समकक्ष (Equivalent) पात्रता निवडावी. सर्व प्रकारच्या दहावी SSC या मूळ पात्रता व जुनी अकरावी SSC ही समकक्ष पात्रता होय. दहावी या पात्रतेतील योग्य ते परीक्षा मंडळ निवडावे. महाराष्ट्र परीक्षामंडळाचे नाव गृहित आहे, इतर मंडळांची नावे दिलेली आहेत.

जर्मन भाषेच्या जलद पदविका अभ्यासक्रमासाठी आवश्यक त्या शैक्षणिक पात्रतेचा मूळ / समकक्ष योग्य तो पर्याय निवडावा. शैक्षणिक पात्रतेचा योग्य पर्याय निवडणे ही तुमची जबाबदारी आहे.

ते गुण सिद्ध करणारी गुणपत्रिका तसेच एक छायाचित्र व सही यांचे स्कॅन करून ते upload documents या ठिकाणी चढवावेत.

३. जर तुम्ही दुसऱ्या कोणत्या पूर्णवेळ अभ्यासक्रमाला आधीच प्रवेश घेतलेला असेल तर ही प्राथमिक माहिती तुम्हाला आपोआप दिसेल. मात्र योग्य ती शैक्षणिक पात्रता निवडणे हे इथे करावे लागेल.

४. आता तुम्ही ‘Application’ येथे जाऊन त्यातील All हा पर्याय निवडा. त्या अंतर्गत तुम्हाला Certificate / Diploma Courses हा पर्याय दिसेल. तो निवडा. मग तुम्हाल परकीय भाषा विभागातील अभ्यासक्रम दिसू लागतील. योग्य तो अभ्यासक्रम निवडून अर्ज पूर्ण भरा. जिथे एकाहून अधिक तुकड्या असतील तेथे तुम्हाला सोयीच्या तुकड्यांचा प्रथम व द्वितीय पसंतीक्रम निवडायचा

आहे. तसेच जर तुम्ही शिकू इच्छित असलेली भाषा तुम्हाला मिळू शकणार नसेल तर कोणती भाषा शिकायला आवडेल याचीही नोंद करून ठेवा.

५. अर्जाचे शुल्क Online पद्धतीने भरायचे आहे. ते केलेल की तुम्हाला तुमचा अर्ज Print या दुव्यावर दिसेल. त्याची एकंदर तीन पाने असतील – अर्ज ; पडताळणी यादी व कबुलीनामा; शुल्काचे चलन. चलनाच्या पानावर तुमचा परकीय भाषा विभागाचा अर्ज क्रमांक दिसला पाहिजे. (उदा FL-2021-FIC-400) जर तो क्रमांक चलनावर दिसत नसेल तर ही बाब त्वरित cspsupport@pun.unipune.ac.in आणि fl@unipune.ac.in यांच्या लक्षात आणून द्यावी. त्यासाठी विषय "FL Application Number not visible on Challan Page" असा ठेवावा व तुमचा अर्ज क्र मजकुरामध्ये सांगावा.

६. सध्याच्या परिस्थितीत अर्जाची छापील प्रत आणून देण्याची गरज नाही. **मात्र अर्ज छापून ठेवला नाही तरी तुमच्या संगणकावर उतरवून ठेवला पाहिजे.**

७. गुणवत्ता याद्या तयार करताना प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी दहावीचे गुण तर जर्मन भाषेच्या जलद पदविका अभ्यासक्रमासाठी आवश्यक त्या शैक्षणिक अर्हतेचे गुण ग्राह्य धरले जातील. गुणवत्ता याद्यांमध्ये महाराष्ट्र शासनाचे आरक्षणाचे नियम लागू होतील.

८. सर्व गुणवत्ता याद्या परकीय भाषा विभाग येथे तसेच CCEP च्या संकेतस्थळावर वेळापत्रकानुसार जाहीर होतील.

९. **आपला प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी -**

अ. गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्याबरोबर त्यात आपले नाव आहे का ते पाहावे.

आ. तुमचे नाव यादीत असेल तर CCEPच्या संकेतस्थळावर जाऊन अर्ज केला त्याच वापरकर्ता नावाने पुन्हा जाऊन अभ्यासक्रमाचे शुल्क भरावे. **विहित वेळेत अभ्यासक्रमाचे शुल्क भरणे आवश्यक आहे**. प्रतीक्षा यादी असलेल्या अभ्यासक्रमांच्या बाबतीत तुम्ही वेळेवर अभ्यासक्रमाचे शुल्क भरले नाहीत तर तुमच्या जागी प्रतीक्षा यादीतील व्यक्तीला प्रवेश मिळतो. प्रतीक्षा यादी नसली तरी तारीख उलटून गेल्यावर तुम्हाला त्या व्यवस्थेत प्रवेश करता येत नाही. **एकदा तास सुरु झाले की नंतर नव्याने कोणाला पहिल्यापासून शिकवणे शक्य होत नाही.**

इ. अभ्यासक्रमाचे शुल्क भरल्यानंतर ते पुन्हा Print या दुव्यावर उपलब्ध होईल. त्याही चलनावर तुमचा अर्ज क्रमांक असला पाहिजे. नसल्यास ही बाब आमच्या लक्षात आणून द्यावी. **हे अभ्यासक्रम शुल्क भरल्याचे चलन वा पावती तुमच्या संगणकावर उतरवून ठेवा.**

**कृपया लक्षात घ्या -**

१. नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणाऱ्यांनो, तुम्ही एकापेक्षा जास्त भाषांसाठी अर्ज करू शकता. मात्र त्यासाठी प्रत्येक भाषेसाठी वेगळे अर्ज शुल्क भरून अर्ज निर्माण केला पाहिजे. जर तुमचे नाव एकापेक्षा जास्त भाषांच्या गुणवत्ता यादीत आले, तर तुम्हाला **प्रवेश कोणत्यातरी एकाच भाषेच्या अभ्यासक्रमाला घेता येईल**. इतर भाषांसाठीचे अर्जाचे शुल्क परत मिळणार नाही.

२. नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणाऱ्यांनो जर तुम्ही मागितलेली भाषा तिसऱ्या गुणवत्ता यादीतही नाव न आल्याने तुम्हाला मिळू शकत नसेल, आणि दुसऱ्या एखाद्या भाषेसाठी जागा शिल्लक असतील

तर तुम्हाला <u>वेगळे प्रवेश शुल्क न भरता</u> तुम्ही निवडलेला दुसऱ्या भाषेचा पर्याय घेण्याबद्दल आमच्याकडून इमेल येईल. त्याला तुम्ही संमती दिलीत की तुमचे त्या भाषेसाठीचे चलन आम्ही तयार करवू व तसा संदेश तुम्हाला येईल.

३. अर्ज तयार केला की प्रवेश मिळाला असे नसते. गुणवत्ता यादीत नाव आले की वेळेवर अभ्यासक्रम शुल्क भरले तरच तुमचा प्रवेश निश्चित होतो.

४. **जर तुम्ही दिलेली माहिती चुकीची आहे असे आढळून आले तर तुमचा प्रवेश रद्द होऊ शकतो. अशा बाबतीत कोणताही फी परतावा मिळणार नाही.**

५. <u>तुम्ही मागितलेली तुकडी तुम्हाला मिळेलच असे नाही. त्याचा उलगडा गुणवत्ता यादी जाहीर करतानाच केलेला असेल.</u>